दै. सकाळ दि. 22.01.25

# रेल्वेस्थानकावर दंगाकाबू रंगीत तालीम







**नांदेड :** नांदेड रेल्वे स्थानक येथे मंगळवारी दहशतवादी हल्ल्याचे प्रात्यक्षिक ( मॉक ड्रिल ) घेण्यात आले यावेळी पोलिस अधिकारी, रेल्वे सुरक्षा बल कर्मचारी व इतर सहभागी झाले होते. प्रात्यक्षिक पाहण्यासाठी उपस्थित प्रवाशांनी गर्दी केली होती. (सर्व छायाचित्रे : पुरुषोत्तम जोशी)

नांदेड, ता. २१ : रेल्वेस्थानकावर मंगळवारी (ता. २१) दंगाकाबू रंगीत तालीम (मॉक ड्रिल) घेण्यात आली. यावेळी दहशतवादी हल्ल्यासह संभाव्य आपत्ती व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक करण्यात आले. पोलिस अधीक्षक लोहमार्ग, छत्रपती संभाजीनगर स्वाती भोर आणि उपविभागीय पोलिस अधिकारी संजय लोहकरे यांच्या मार्गदर्शनाखाली तालीम आयोजित करण्यात आली होती.

तालमीत लोहमार्ग पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक हनुमंत पांचाळ, बाँबशोधक व नाशक पथकाचे पोलिस निरीक्षक सुगावे, एटीबीचे पोलिस निरीक्षक गुट्टे, पोलिस उपनिरीक्षक बोधगिरे, जलद प्रतिसाद पथकाचे कर्मचारी, अग्निशमन दल, रेल्वे सुरक्षा बलाचे अधिकारी व अंमलदार यांनी सहभाग घेतला. प्रात्यक्षिकादरम्यान रेल्वे स्थानकावरील सुरक्षेच्या उपाययोजनांचे परीक्षण करण्यात आले.